जा.क्र.स्थागुअशा/प्रेसनोट/ १३११/2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग
दुरध्वनी क्रमांक - 02362-228209
Email -lcb.sindhudurg@mahapolice.gov.in
दि. ०१/ 06 /2020.

# **** प्रेसनोट ****

## पल्स ऑक्सिमीटर व इन्फ्रारेड थर्मल स्कॅनर मशिनच्या माध्यमातुन दररोज होणार पोलीसांची तपासणी

कोरोना विषाणु संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर मागील दोन महिन्यापासुन संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन घोषित करण्यात आलेला आहे. या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल आपले कार्यक्षेत्रात सतर्कपणे दैनंदिन कर्तव्य बजावत आहेत. कर्तव्य बजावताना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा जनतेशी संपर्क येत असतो. परंतु ज्या व्यक्तीशी आपण संपर्कात आलो आहे, त्या व्यक्तीला कोरोनाची लक्षणे आहेत अगर कसे? हे माहित नसते.दैनंदिन कर्तव्य बजावत असताना नकळतपणे कर्तव्यावरील पोलीस कोणत्याही प्रकारे कोरोना विषाणुच्या संपर्कात येण्याची दाट शक्यता आहे.

या सर्व पार्श्वभुमीचा विचार करता, पोलीसांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याकरीता मा.पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी जिल्हयातील प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्राथमिक तपासणी करण्याकरीता पल्स ऑक्सिमीटर व इन्फ्रारेड थर्मल स्कॅनर मशिन याचा वापर सुरु केलेला आहे. जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे, उपविभागीय कार्यालये, पोलीस मुख्यालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता साधनसामुग्री पुरविण्यात आलेली आहे.

पल्स ऑक्सिमीटरच्या माध्यमातुन रक्तातील हिमोग्लोबिनची ऑक्सिजन वाहन क्षमता ओळखण्यास मदत होणार असुन कोविड-19 रोगाचे प्राथमिक लक्षण असलेल्या तापाचे अवलोकन करण्यासाठी इन्फ्रारेड थर्मल स्कॅनर मशिनचा उपयोग करण्यात येणार आहे. या मशिन्सच्या माध्यमातुन शरीराच्या तापमानाच्या नोंदी तसेच रक्तातील ऑक्सिजनबाबतच्या नोंदी दररोज घेऊन, **Sindhudurg Health Checklist** व **Sindhu 50 Plus** या Online Excel Sheet मध्ये नमुद करण्यात येणार आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हयात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकामी अहोरात्र प्रयत्न करणा-या जिल्हयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांना कोणतीही प्राथमिक लक्षणे दिसुन आल्यास त्याचेवर वेळीच उपाययोजना करणे पल्स ऑक्सिमीटर व इन्फ्रारेड थर्मल स्कॅनर मशिन यांच्यामाध्यमातुन शक्य होणार आहे.

(सुनिल धनावडे)
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी,
सिंधुदुर्ग

प्रत- जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग.